S - F 65 TC
3F05\ .R.7775

8/3 पो

[redacted] पावती Original/Duplicate
Tuesday,February 06 ,2018 नोंदणी क्रं. :39म
2:11 PM Regn. :39M

पावती क्रं.: 715 दिनांक: 06/02/2018

गावचे नाव: पेडणे

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: बसल2-650-2018

दस्तऐवजाचा प्रकार : विलसनकरारनामा

सादर करणाऱ्याचे नाव: पार्टीचे ऐण्ड पवार असोसिएट्स चे भागिदार श्री विलय इनामदार वगैरे - -

नोंदणी फी	रु. 30000.00
दस्त हाताळणी फी	रु. 920.00
पृष्ठांची संख्या: 48	
एकूण:	रु. 30920.00

आपणास मूळ दस्त ,धनलेख बिट्स तुमी-2 वेळ 2:12 PM ह्या वेळेस मिळेल.

Sub Registrar Jalgaon 2

बाजार मुल्य: रु.5200000 /-
मोबदला रु.0/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 260500/-

1) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH010207992201718E दिनांक: 06/02/2018
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: By Cash रक्कम: रु 920/-

मूळ दस्त परत मिळाला

जलन - २
दस्त.क्र. ९८७ /२०१८
९१४९

CHALLAN
MTR Form Number-6

GRN	MH010[illegible]N9017198	BARCODE		Date	08/02/2018-18:58:00	Form ID	[illegible]

Department	Inspector General Of Registration	Payer Details	
Type of Payment	Stamp Duty Registration Fee	TAX ID (If Any)	
		PAN No.(If Applicable)	BHPPP[illegible]4H
Office Name	JLG3_JALGAON 2 JOINT SUB REGISTRAR	Full Name	PATIL AND PAWAR ASSOCIEAT PARTNER VIJAY DATTATRAY PATIL
Location	JALGAON		
Year	2017-2018 One Time	Flat/Block No.	SR NO 457/2 PAI PLOT NO 69A 26B 26C PANI
Account Head Details	Amount in Rs.	Premises/Building	WEST SIDE SO MTR 697.00
0030046101 Stamp Duty	290500.00	Road/Street	MEHARUN
0030063801 Registration Fee	30000.00	Area/Locality	JALGAON
		Town/City/District	
		PIN	4 2 5 0 0 2
		Remarks (If Any)	
		PAN2=AKWPP[illegible]7M|~SecondPartyName=SHAILESH BHAGWAT WADE AND ONE|~CA=3|~Market[illegible]=3000000	
Total	3,20,500.00	Amount In Words	Two Lakh Ninety Thousand Five Hundred Rupees Only

DEFACED ₹ 290500.00 DEFACED

Payment Details	STATE BANK OF INDIA	FOR USE IN RECEIVING BANK			
Cheque-DD Details		Bank CIN	Ref. No.	00[illegible]2018[illegible]0012[illegible]	IKC9JLNL12
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	08/02/2018-04:00:11	Not Verified with RBI
Name of Bank		Paid-Branch		STATE BANK OF INDIA	
Name of Branch		Scroll No. , Date		[illegible]	

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document. [illegible]

Challan Defacement Details

Sr. No.	Remarks	Defacement No.	Defacement Date	User Id	Defacement Amount
1	[illegible]	[illegible]	08/02/2018-14:01:04	IGR[illegible]	30000.00
2	[illegible]	[illegible]	08/02/2018-14:01:04	IGR[illegible]	290500.00
Total Defacement Amount					3,20,500.00

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 सह-दुय्यम निबंधक वर्ग-२ जळगांव JALGAON-2

Print Date 08-02-2018 02:01:07

दस्ताचा प्रकार — भुविकास व जनरल मुखत्यार पत्र
दस्त नोंदणीचा तपशील(S.R.O.) — जळगाव
जी.आर.एन.नंबर — MH 010200799201718E
मिळकतीचे थोडक्यात वर्णन — मेहरूण सर्व्हेनं.४५७/२पै.,प्लॉट नं. २६अ+२६ब+२६क यापैकी पश्चिम बाजुकडील बखळ जागा.
मोबदला रक्कम — -
मुद्रांक खरेदीदाराचे नाव/पक्षकार — पाटील अॅण्ड पवार असोसिएटस चे भागिदार,
दस्तातील दुसऱ्या पक्षकाराचे नाव — श्री.शैलेश भागवत रडे व १,
मुद्रांक शुल्काची रक्कम — रुपये २,६०,१००/-
मुद्रांक शुल्काची रक्कम (अक्षरी) — रुपये दोन लाख साठ हजार मात्र.



॥श्री॥

जळ न - २
दस्त क्र. ६८७ /२०१८
२१४६

भुविकास करारनामा
व
जनरल मुखत्यार पत्र



मेहरूण शिवारातील शहर जळगाव महानगरपालिका हद्दीतील स्थावर मिळकत बखळ जागेचे किंमत रुपये १२,००,०००/- अक्षरी रुपये बारावण्ण लाख मात्रवर मुद्रांक बिला आहे.ता. ०३/०२/२०१८, ईसवी.,

पाटील अॅण्ड पवार
असोसिएटस चे भागिदार
१) श्री.विजय दत्तात्रय पाटील,
उ.व.४६,धंदा-व्यापार; रा.प्लॉट नं.१,
प्लॉट नं.१, गौरी प्राईड, भोईटे नगर,
यश लॉन रोड, शहर जळगांव, ता.जि.जळगांव.,
PAN- BIHPP0344Q

लिहुन घेणार

ज ल न - २
दस्त क्र ६८७ /२०१८
३/४६

२) श्री.राहुल प्रभाकर पवार
उ.व.३८,धंदा-व्यापार;रा. ४५,
भोईटे नगर, शहर जळगांव,
ता.जि.जळगांव.,
PAN- ALXPP9494P

लिहुन घेणार

१) श्री.शैलेश भागवत रडे,
उ.व.३४,धंदा- नोकरी;
PAN- AKWPR5728E
२) सौ.समृध्दी शैलेश रडे,
उ.व.३५,धंदा- गृहिणी व नोकरी;
PAN- AFBPJ9309M
ढोघे रा. ११५, नवी पेठ, शहर जळगांव,
ता.जि.जळगांव., पिन- ४२५००१

लिहुन देणार

कारणे भुविकास करारनामा व जनरल मुखत्यार पत्र लिहुन देतोत की,

*** <u>मिळकतीचे वर्णन</u>** - तुकडी जिल्हा जळगाव पोट तुकडी जळगाव तालुका जळगाव **पैकी मेहरूण** शिवारातील जळगाव महानगरपालिका हद्दीतील विभाग क्रमांक ७/२१२ मधील :-

मौजे मेहरूण शेत सर्व्हे नंबर ४५७/२पै.,
यांत मे. जिल्हाधिकारी साहेब जळगांव यांचेकडील बिनशेती हुकुम नंबर जमीन/१०९३/एस.आर./७८,दिनांक ०१/०९/१९९४,अन्वये तसेच मे.चिफ ऑफिसर सो.म्युनिसिपल कौन्सिल जळगांव यांचेकडील पत्र क्रमांक ८८७, तारीख २९/१२/१९९८ अन्वये व त्यांनी



ज ल च - २
दस्त क्र. ६८७ /२०१८
४/४६

मंजुर केलेल्या डिमार्केटेड नकाशा प्रमाणे तसेच **मे. जिल्हाधिकारी साहेब जळगांव यांचेकडील बिनशेती हुकुम नंबर जमीन/१०९७/एस.आर./ २४८/९७,दिनांक २९/०६/१९९८,व त्यांनी संमत केलेल्या नकाशाप्रमाणे प्लॉटस पाडलेले आहेत. त्या प्लॉटपैकी :-**

प्रत नंबर १) प्लॉट नंबर २६अ (सव्वीस-अ)

याचे क्षेत्र २८०.०० चौ.मि. याची लांबी रूंदी :- पुर्व बाजू मिटर २०.००; पश्चिम बाजू मिटर २०.०० ; उत्तर बाजू मिटर १४.००; दक्षिण बाजू मिटर १४.००; **यासी चतु:सिमा:-** पुर्वेस:- प्लॉट नंबर २६ब; पश्चिमेस:- रोड रस्ता,: उत्तरेस:- रोड रस्ता:. दक्षिणेस:- प्लॉट नंबर ११;.

प्रत नंबर २) प्लॉट नंबर २६ब (सव्वीस-ब)

याचे क्षेत्र २८०.०० चौ.मि. याची लांबी रूंदी :- पुर्व बाजू मिटर २०.००; पश्चिम बाजू मिटर २०.०० ; उत्तर बाजू मिटर १४.००; दक्षिण बाजू मिटर १४.००; **यासी चतु:सिमा:- पुर्वेस:- प्लॉट नंबर २६क; पश्चिमेस:- प्लॉट नंबर २६अ,: उत्तरेस:-** रोड रस्ता:. **दक्षिणेस:-** प्लॉट नंबर ११ व प्लॉट नंबर १२;.

प्रत नंबर ३) प्लॉट नंबर २६क (सव्वीस-क)

याचे क्षेत्र २८०.०० चौ.मि. याची लांबी रूंदी:- पुर्व बाजू मिटर २०.००; पश्चिम बाजू मिटर २०.०० ; उत्तर बाजू मिटर १४.००; दक्षिण बाजू मिटर १४.००; **यासी चतु:सिमा:-** पुर्वेस:- रोड रस्ता; पश्चिमेस:- प्लॉट नंबर २६ब ,: उत्तरेस:- रोड रस्ता:. दक्षिणेस:- प्लॉट नंबर १२;.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील प्रत नंबर १ ते ३ मधील स्थावर मिळकत बखळ प्लॉट जागेमध्ये **मे.सहाय्यक संचालक नगररचना**

ज ल न २
दस्त क्र. ६८० /२०१७
५।४६

महानगरपालिका जळगांव यांचेकडील मंजुर नकाशा पत्र जा.क्र./टी.पी./सब/ए.एम.ए.एल./७३६, तारीख १६/०६/२०१७, तसेच मे. उपविभागीय अधिकारी जळगांव भाग जळगांव यांचेकडील आदेश क्रमांक जमिन/कावि/ईटपाल/२०१७/४१२२,तारीख १७/११/२०१७, अन्वये व त्यांनी मंजुर केलेल्या नकाशा प्रमाणे एकत्रीकरण झालेले आहे. त्यानुसार सदर प्लॉट जानेस प्लॉट नंबर २६अ+२६ब+२६क याचे एकुण क्षेत्र ८४०.०० चौ.मि. असे झालेले आहे.बासी चतु:सिमा:- पुर्वेस :- गट नंबर २/२ब:, पश्चिमेस :- ९ मिटर रुंदीचा रोड रस्ता:, दक्षिणेस:-६ मिटर रुंदीचा रोड रस्ता:,उत्तरेस :-६ मिटर रुंदीचा रोड रस्ता :,येणेप्रमाणे वर वर्णन केलेली स्थावर मिळकत बक्षळ प्लॉट जागा आतील दगड, माती, जमिन, वगैरेसह तदंगभुत वस्तुसुध्दा **(जिचा उल्लेख यापुढे मिळकत असा केलेला आहे)**.

वर वर्णन केलेली प्लॉट नंबर २६अ+२६ब+२६क याचे एकुण क्षेत्र ८४०.०० चौ.मि. या जागेवर वाढीव बांधकाम करण्यासाठी आम्ही सौ.संगिता विनय पारख,रा.जळगांव यांचेकडुन दस्त नंबर २६७४/२०१७, तारीख १९/०८/२०१७, अन्वये २१२.६४ चौ.मि. तसेच श्री.महेंद्रकुमार चंद्रभान पाहुजा (ए.कु.क.)रा.जळगांव यांचेकडुन दस्त नंबर २६७३/२०१७, तारीख १९/०८/२०१७, अन्वये १९५.१० चौ.मि. व दस्त नंबर २६७५/२०१७, तारीख १९/०८/२०१७, अन्वये ९७.७४ चौ.मि.असा टी.डी.आर क्षेत्र विकत घेतलेला आहे. सदर टी.डी.आर चे खरेदीदस्त म.सह दुय्यम निबंधक वर्ग-२ जळगांव-१ यांचे कचेरीत नोंदलेला आहे.,

येणेप्रमाणे प्लॉट जागेचे क्षेत्र ८४०.०० चौ.मि. व टी.डी.आर क्षेत्र ५८९.२८ चौ.मि. अशा एकुण क्षेत्रावर बांधकाम करणेसाठी **आम्ही मे.आयुक्त**

JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2

ज ल ग - २
दस्त क्र. ६८७ /२०१९
६।४६

साहेब महानगरपालिका जळगांव यांचेकडील कमेन्समेंट सर्टिफिकेट नंबर टी.पी./बी.पी./६३६, तारीख २९/०८/२०१७ अन्वये बांधकामाची परवानगी घेवुन तसा बांधकामाचा नकाशा मंजुर केलेला आहे. यापैकी :-

पश्चिम बाजुकडील बखळ जागा याचे क्षेत्र ५६७.०० चौ.मि. व यावरील फ्लॅट सिस्टीम इमारतीचे एकुण बांधीव क्षेत्र १२३७.१० चौ.मि.राहील. याची खुल्या जागेची लांबी रूंदी :- पुर्व बाजु मिटर २०.००:- पश्चिम बाजु मिटर २०.००:, दक्षिण बाजु मिटर २९.८५:, उत्तर बाजु मिटर २९.८५:, यासी चतु:सिमा:- पुर्वेस :- याच प्लॉटपैकी आमचे मालकीची उर्वरीत शिल्लक बखळ जागा क्षेत्र २४३.०० चौ.मि.:, पश्चिमेस :- ९ मिटर रूंदीचा रोड रस्ता:, दक्षिणेस:-प्लॉट नंबर ११ व १२:,उत्तरेस :- ६ मिटर रूंदीचा रोड रस्ता :, **येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकत** ही या विकास करारातील मिळकत होय. प्रस्तुत दस्तात **"मिळकत"** हा शब्द प्रयोग जेथे जेथे करण्यात आलेला आहे. त्याचा अर्थ वर वर्णन केलेली मिळकत असा आहे. तसेच संक्षिप्ततेसाठी वरील प्रमाणे शब्द प्रयोग दस्तात केलेला असला तरी शब्दांचा विस्तृत अर्थ वरील प्रमाणे गृहीत धरण्यात आलेला आहे.

वर वर्णन केलेली मिळकत ही आमची संपुर्ण मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष कबजे उपभोगातील आहे. सदरची मिळकत ही **आम्हाला डेव्लपमेंटसाठी** द्यावयाची होती व तुम्हास सुध्दा डेव्हलपमेंटसाठी मिळकतींची गरज होती म्हणून आपण दोघांमध्ये सदर मिळकतीबाबत बोलणी होऊन आज रोजी विकास करणेकरीता सदर मिळकतींचा प्रत्यक्ष कबजा तुम्हास दिला आहे. <u>सदर डेव्हलपमेंट कराराच्या अटी व शर्ती:-</u>

दु.नं. - २
दस्त.क्र. ६८० /२०१८
८/४६

१) **सदरचे** विकास करारनाम्या नुसार सदरची मिळकतीवर बांधकाम करुन विकसित करण्यासाठी **आपले** उभयतांमधे ठरलेल्या करारानुसार **तुमचे** प्रत्यक्ष ताब्यात व कबजे वहिवाटीत आज रोजी दिलेली आहे.

२) **सदर** वर सविस्तर वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधात रेव्हेन्यु अधिकाऱ्यातुन ७/१२ उतारे, ड पत्रक, नोंदी, व इतर विकसना संबंधीत कागदपत्रे घेणे, त्याकामी अर्ज करणे, त्यावर सह्या करणे, त्यासाठी लागणारे फी भरणे, तसेच रेव्हेन्यु विभाग यांचेकडील विकसनासंबंधात जी जी कामे करावी लागतील ती ती सर्व कामे करण्याचे **हक्क व अधिकार आम्ही तुम्हांस या कराराने दिलेले आहेत.**

३) **सदरचे** प्लॉट मिळकतीवर बांधकामाचा नकाशा **शहर जळगांव महानगरपलिका यांचकेकडील कमेन्समेंट सर्टीफिकेट नंबर टी.पी./बी.पी./६३६, तारीख २१/०८/२०१७ अन्वये बांधकामाची परवानगी** मिळालेली आहे. तसेच **तुम्हांस** योग्य वाटल्यास नियमानुसार सदरचे नकाशात फेरबदल करून रिव्हाईज नकाशे मंजुर करून घेणे, त्याबाबतच्या परवानग्या घेणे, त्याप्रमाणे बांधकाम पुर्ण झाल्यावर कम्प्लीशनचे नकाशे तयार करणे शहर जळगांव महानगरपालिका जळगांव यांचेकडुन कम्प्लीशन सर्टिफिकेट घेणे तसेच त्याकामी संबंधीत शासकीय, निमशासकीय यांचे कार्यालयात **माझे मुखत्यार** म्हणुन काम पाहणे त्यावर **आमचे मुखत्यार म्हणुन तुम्ही** सह्या करणे वगैरे हक्क व **अधिकार आम्ही तुम्हांस** या विकसन कराराने दिलेले आहे. तसेच सदर कामी जो काही खर्च येईल तो संपुर्ण खर्च **तुम्ही लिहुन घेणार** यांनीच करावयाचा आहे.

JOINT SUB-REGISTRAR CLASS-II
सह दुय्यम निबंधक वर्ग-२ जळगांव क्र.-२

ज ल ग - २
दस्त क्र. ६८७ /२०१८
८।४६

४) **सदर** वर सविस्तर वर्णन केलेली प्लॉट मिळकत **आम्ही तुम्हांस डेव्हलपमेंटसाठी** दिलेली असल्यामुळे त्या प्लॉट मिळकतीचे बदल्यात **तुम्ही आम्हांस** मोबदला म्हणुन सदर प्लॉट जागेवर नव्याने बांधकाम होणार असलेल्या नियोजीत रहिवासी फ्लॅट सिस्टीमचे इमारतीमध्ये खालील प्रमाणे फ्लॅट **आम्हांस** मिळावयाचे आहेत. **त्याचा तपशील :-**

१) **दुसऱ्या मजल्यावरील पुर्व दक्षिण कोपऱ्यातील फ्लॅट नंबर २०४ याचे आज मासे कारपेट क्षेत्र ३१.९८ चौ.मि. व बिल्टप क्षेत्र ३९.४१ चौ.मि. तसेच तळ जमिनीतील सामाईकातील अविभक्त हिस्सा क्षेत्र २८.६७ चौ.मि.,**

२) **तिसऱ्या मजल्यावरील पश्चिम दक्षिण कोपऱ्यातील फ्लॅट नंबर ३०१ याचे आजमासे कारपेट क्षेत्र ३२.२१ चौ.मि. व बिल्टप क्षेत्र ३८.३३ चौ.मि. तसेच तळ जमिनीतील सामाईकातील अविभक्त हिस्सा क्षेत्र २८.२४ चौ.मि.,**

३) **चौथ्या मजल्यावरील पश्चिम उत्तर कोपऱ्यातील फ्लॅट नंबर ४०२ याचे आजमासे कारपेट क्षेत्र ३२.१९ चौ.मि. व बिल्टप क्षेत्र ३८.३३ चौ.मि. तसेच तळ जमिनीतील सामाईकातील अविभक्त हिस्सा क्षेत्र २८.२४ चौ.मि.,**

४) **पाचव्या मजल्यावरील पुर्व उत्तर कोपऱ्यातील फ्लॅट नंबर ५०३ याचे आजमासे कारपेट क्षेत्र ६०.१९ चौ.मि. व बिल्टप क्षेत्र ७०.९९ चौ.मि. तसेच तळ जमिनीतील सामाईकातील अविभक्त हिस्सा क्षेत्र ३४.२९ चौ.मि.,**

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2 सह-दुय्यम निबंधक वर्ग-२ जळगांव सत्यमेव जयते

दस्त क्र. ६८० /२०१८
९१४६

असे एकुण ४ (चार) फ्लॅटस लिहुन देणार यांना मिळावयाचे असुन उर्वरीत संपुर्ण १६ (सोळा) फ्लॅट तळ जागेतील सामाईक अविभक्त हिश्श्यासह लिहुन घेणार यांना मिळावयाचे आहे. हे सर्व लिहुन घेणार व लिहुन देणार यांना मान्य व कबुल आहे.

१) **सदरचे** फ्लॅट मिळकतीवर डेव्हलपमेंट तुम्ही तुमचे स्वखर्चाने करावयाचे आहे. त्यासाठी आर्किटेक्ट नेमणे, कॉन्ट्रक्टर नेमणे, मजुर, कारागीर नेमणे, बांधकामासाठी लागणारे संपुर्ण मटेरीयल व साहित्य तुम्ही तुमचे नावाने खरेदी करणे, सदर कामी होणाऱ्या खर्चाचा हिशोब ठेवणे वगैरे काम करण्याचे हक्क व अधिकार **आम्ही लिहुन देणार यांनी तुम्ही लिहुन घेणार** यांना सदरचे विकसन कराराने दिलेले आहे. त्यात सर्व प्रकारचे कर, इलेक्ट्रीक बिले, जी.एस.टी.आपण विकसन करणार यांनी त्यांचे स्वखर्चाने भरावयाची आहेत. मात्र **लिहुन देणार** यांना मिळणार असलेल्या **४(चार)** फ्लॅटचे हिश्याबाबत जे काही वरील प्रमाणेचे कर येतील ते **लिहुन देणार** यांनी स्वखर्चाने भरावयाचे आहे.

६) **सदर** प्लॉट मिळकतीवर बांधले जाणारे नियोजित इमारतीतील **आम्हांस** मिळणार असलेले वरील प्रमाणेचे **४(चार)** फ्लॅट सोडुन इतर **१६(सोळा)** फ्लॅट बाबत **तुम्ही खरेदी घेणारे** इसमांसोबत सौदापावती करणे, किंमती ठरविणे, त्यापोटी बयाणा रक्कम स्विकारणे, वेळोवेळी मिळणाऱ्या रकमा स्विकारणे, त्या बाबतच्या पावत्या देणे, जरूर वाटल्यास सदर बाबतच्या सौदेपावत्या तयार करणे, त्याकामी वकीलांची मदत घेणे, सदरच्या सौदापावत्यांवर प्लॉट मालक म्हणुन सह्या करणे व बांधीव स्ट्रक्चरचे मालक म्हणुन सुध्दा **तुम्ही लिहुन घेणार** यांनीच सहया करणे, सदर संपुर्ण इमारतीबाबतचे

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2

जळगाव - २
दस्त क्र. ६८०/२०१९
१०/४६

घोषणापत्र तयार करून नोंदविणे तसेच सदरच्या सौदापावती नोंदणीकामी सब-रजिस्ट्रार जळगांव यांचे कार्यालयात हजर करणे, त्यांचे कार्यालयातील संगणकावर फोटो व अंगठ्याचे ठस्से देणे, त्यांचे कार्यालयातील कागदपत्रांवर सह्या करणे व सदरच्या सौदापावत्या सब रजिस्ट्रार जळगांव यांचे कार्यालयात लिहुन व नोंदवुन देणेकामी जी जी काही कामे करावी लागतील ती ती सर्व कामे तुम्ही लिहुन घेणार यांनी करण्याचे हक्क व अधिकार आम्ही लिहुन देणार यांनी तुम्ही लिहुन घेणार यांना सदरचे करारान्वये दिलेले आहे. व ते आम्ही लिहुन देणार यांना मान्य व कबुल आहे.

७) **वर** सविस्तर केलेल्या फ्लॅट मिळकतीवर बांधल्या जाणाऱ्या नियोजित इमारतीतील वर वर्णन केल्या प्रमाणे चे **४(चार)** फ्लॅट हे लिहुन देणार यांना मिळणार असुन त्याचा लिहुन देणार यांनी त्यांचे मर्जीनुरूप उपभोग घ्यावा अगर मर्जीनुरूप विनियोग करावा त्यास लिहुन घेणार यांची कोणत्याही प्रकारची हरकत राहणार नाही. तसेच **लिहुन घेणार** यांना वर वर्णन केल्या प्रमाणे मिळणाऱ्या उर्वरीत **१६ (सोळा)** फ्लॅट मध्ये तळ मजल्याचे सामाईकातील अविभक्त क्षेत्र, व वरील प्रमाणे फ्लॅटस मिळावयाचे असुन त्यांचा **तुम्ही तुमचे** मर्जीनुरूप उपभोग घ्यावा अगर मर्जीनुरूप विनियोग करावा. **त्यासाठी लागणाऱ्या सह्या आम्ही विनामुल्य देवु.**

८) **सदर** प्लॉट जागेवरील नियोजित इमारतीतील तुम्हांस मिळणाऱ्या **१६ (सोळा)** फ्लॅटसचे बांधीव क्षेत्र बांधकाम विकत घेणारे इसम कोणत्याही वित्तीय संस्थेकडुन बांधकामावर कर्ज घेवु शकतील, गहाणखत करून देऊ शकतील मात्र सदर इसमांना आपण उभयतांनी करून दिलेले करारनामे अगर त्यांनी घेतलेले कर्ज अगर व्याज याची

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांची मुद्रा सत्यमेव जयते जळगांव-२ JALGAON-2

दु.नं. २ - २
दस्त क्र. ६८७ /२०१६
११।४६

काही एक जबाबदारी आम्ही लिहुन देणार व तुम्ही लिहुन घेणार यांचेवर नाही व पुढेहि राहणार नाही. त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी कर्ज घेणारे इसमांची राहील.

१) **सदर** योजना राबवितांना लिहुन घेणार यांना मिळणाऱ्या फ्लॅटस बाबत अन्य तिऱ्हाईक इसमांसोबत जे काही करारनामे करावे लागतील ते करारनामे तुम्ही लिहुन घेणार यांचेवर बंधनकारक राहतील. त्याबाबत लिहुन देणार यांची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

१०) **सदर** प्लॉट जागेवर तुम्ही बांधकाम करणार असलेल्या बांधकामाची व त्या अनुषंगाने बांधावयाचे इमारतीची संपुर्ण जबाबदारी ही तुम्ही लिहुन घेणार यांचीच आहे व राहील. मात्र सदर प्लॉट जागेवरील बांधकामाबाबत ची काही एक जबाबदारी आम्ही लिहुन देणार यांचेवर राहणार नाही. सदर इमारतीचे बांधकाम हे नियमाप्रमाणे व मंजुर नकाशाप्राणेच करावयाचे आहे. तसेच सदर इमारतीचे कंम्प्लीशन सर्टिफिकेट ही आणुन देण्याची जबाबदारी लिहुन घेणार यांचेवर आहे व राहील.

११) **सदर** प्लॉट जागेवर तुम्ही तुमचे नावाचा बांधकामाबाबतचा योग्य तो बोर्ड लावु शकता तसेच बांधकामाबाबत जाहिरात करू शकता व डेव्हलपमेंटकामी सदर प्लॉट जागेवर जाऊ येऊ शकतात त्यांस आम्ही लिहुन देणार यांची काही एक हकरत राहणार नाही.

१२) **सदर** प्लॉट जागेवरील विकासाकामी डेव्हलपमेंटसाठी शेड बांधणे, नळाचे कनेक्शन घेणे, इलेक्ट्रीकचे कनेक्शन घेणे वगैरे अधिकार तुम्हांस या कराराने दिलेले आहेत. मात्र सदर बाबतचे येणारी बिले डेव्हलपर म्हणुन तुम्ही लिहुन घेणार यांनीच भरावयाचे आहे.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2

ज ल न - २
दस्त.क्र. ६८७/२०१८
१२१४६

१३) सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या प्लॉट मिळकत आम्ही कोठेही गहाण, दान, लीज,खरेदी, विक्री, बक्षिस लेखी अगर तोंडी करारात वा अन्य कोणत्याही जड जोखमीत दिलेली नाहीत तसेच प्रस्तृतचे करारान्वये आम्ही कोणत्याही प्रकारे इतर कोणासही हस्तांतरण करणार नाही किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचा बोजा निर्माण करणार नाही अगर तुम्ही लिहुन घेणार यांचे हक्कास बाधा येईल असे कोणत्याही प्रकारचे कृत्य आम्ही लिहुन देणार करणार नाही याची ग्याही व खात्री आम्ही तुम्हांस सदर कराराने तुम्हांस दिलेला आहे.

१४) सदर उपरोक्त प्लॉट जागेबाबतचा विकसन करारनामा आम्ही तुम्हांस आज रोजी लिहुन व नोंदवुन दिलेला असला तरी सदर प्लॉट जागेवरील नियोजित इमारतीचे बांधकाम तुम्ही लिहुन घेणार यांनी नकाशा मंजुर झाले दिवसापासुन **३६ (छत्तीस)** महिन्याचे कालावधीत पुर्ण करावयाचे आहे.

१५) सदर डेव्हलपमेंट करारासाठी व इतर संबंधीत कागदपत्रांसाठी लागणारा संपुर्ण खर्च तुम्ही घेणार यांनीच करावयाचा आहे.

१६) सदरचा डेव्हलमेंट (विकास) करारनामा सदर प्लॉट मिळकती वरील नियोजित इमारतीतील फ्लॅट बांधकाम खरेदी घेणारे इसमांचे नावाने पुर्णपणे तबदिल होईपावेतो अस्तित्वात रहावयाचे आहे व राहील.

१७) सदरचा विकसन-डेव्हलपमेंट करारनामा आम्ही लिहुन देणार व आमचे पश्चात आमचे वंशवालीवारस तसेच तुम्ही लिहुन घेणार व तुमचे पश्चात तुमचे वशंवालीवारस वगैरे यांचेवर बंधनकारक आहे व पुढेही राहील व तसा करार वरील वारसांनी एकमेकांना त्या परिस्थितीत संमती दर्शक म्हणुन करून द्यावयाचा आहे.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2

जे ९ न - २
दस्त.क्र. ६७० /२०१८
९३/४६

१८) **सदर** वर सविस्तर वर्णन केलेल्या प्लॉट जागेबाबत काही एक वाद उत्पन्न झाल्यास त्याकामी दिवाणी, फौजदारी, धर्मदाय, सहकारी व इतर अन्य न्यायालयात काही एक दावे फाटे दाखल झाल्यास त्याबाबतचे संपुर्ण निवारण आम्ही लिहुन देणार यांचेवर आहे व राहील.

१९) **सदर** इमारतीत नामांकित कंपनीची एक लिफ्ट तुम्ही तुमचे खर्चाने लावावयाची आहे. तसेच पाणी साठवुन ठेवण्यासाठी अंडरग्राऊंड एक पाण्याची टाकी व वापरण्यासाठी गच्चीवर एक पाण्याची टाकी बांधुन द्यावयाची आहे. त्याचा खर्च तुम्ही लिहुन घेणार यांनी करावयाचा आहे. त्याची कोणतीही जबाबदारी लिहुन देणार यांचेवर राहणार नाही.

२०) **सदर** वर सविस्तर वर्णन केलेली स्थावर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोझेविरहीत असून आम्ही ती यापुर्वी कोठेही गहाण, दान, लीज, खरेदी, विक्री, बक्षीस, लेखी अगर तोंडी करारात वा अन्य कोणत्याही जड जोखमीमध्ये व तुमचे व्यतिरिक्त दुसऱ्या कोणासही विकास करारात दिलेली नाही. सदर मिळकतीस क्लिअर व मार्केटेबल असे टायटल आहे व सदर मिळकत आम्ही कोणत्याही प्रकारे इतर कोणासही हस्तांतरण करणार नाही व तुमचे विकास हक्कासह बाधा येईल असे कोणतेही कृत्य करणार नाही.

२१) **सदर** प्लॉट जागेवर नियोजित इमारतीचे बांधकाम करतांना कोणताही अपघात, जिवहानी, वित्तहानी झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी डेव्हलपर म्हणुन तुमचेवर आहे व राहील. त्याबाबतची काही एक आर्थिक तोषीस प्लॉट मालक म्हणुन आमचेवर राहणार नाही. किंवा त्यामुळे बांधकाम विलंब झाल्यास, व्यत्यय आल्यास प्लॉट मालक म्हणुन आमची काही एक जबाबदारी राहणार नाही.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 सह दुय्यम निबंधक वर्ग-२ जळगांव JALGAON-2

दस्त.क्र. ६८७ /२०१९
१४/४६

२२) सदर वर वर्णन केलेला डेव्हलपमेंट करार आम्ही लिहुन देणार नंबर १ व २ यांनी तुम्हांस आज रोजी लिहुन दिलेला असला तरी सदरची बाब आम्ही लिहुन देणार यांचे कुटुंबातील घटकांचे संमतीनेच झालेली आहे. सबब सदर बाबत भविष्यात आम्ही लिहुन देणार यांचे कुटुंबातील घटकांचे काही एक म्हणणे, मागणे वगैरे राहु नये म्हणुन त्यांनी सदरचे लेखावर करारावर संमती दर्शक साक्षीदार म्हणुन सह्या केलेल्या आहे व सदरचे लेखास मान्यता व संमती देवुन त्याबाबत त्यांचे काही एक म्हणणे, मागणे नसल्याबाबतची संमती सदरचे करारान्वये दिलेली आहे.

२३) सदर प्लॉट जागेवर **सह.दुय्यम निबंधक वर्ग-२ जळगांव-१ यांचे कार्यालयात लिहुन देणार नंबर २ यांचे नावाने वर वर्णन केल्या प्रमाणे क्षेत्र चौ.मि.५८५.२८ टी.डी.आर. खरेदी** केलेला असुन त्याचा खर्च लिहुन घेणार यांनीच दिलेले आहे. तसेच **मा.आयुक्त साहेब जळगांव महानगरपालिका** यांचेकडुन नकाशा मंजुर केलेला असुन त्याचे पैसे सुध्दा लिहुन घेणार यांनीच भरलेले आहेत. तसेच सर्व टॅक्सेस सुध्दा लिहुन घेणार यांनीच भरलेले आहेत.

२४) सदर इमारत तयार झाल्या नंतर लिहुन देणार यांनी त्यांना मिळणाऱ्या ४ (चार) फ्लॅटची देखभालीसाठी लिहुन घेणार यांचेकडे आपसांत ठरलेप्रमाणे रक्कम जमा केल्या नंतर त्यांना फ्लॅट ताब्यात देण्यात येतील. तसेच लिहुन घेणार यांचे फ्लॅट विक्री नंतर त्यांची विक्री केलेल्या फ्लॅटच्या देखभालीच्या रकमा देखील जमा करावयाच्या आहेत.

२५) सदर इमारतीत प्रत्येक फ्लॅट धारकांस पार्किंगची जागा देण्यात येईल. व त्या जागेवरच फ्लॅट धारकांनी त्यांचे वाहन लावण्यासाठी बंधनकारक राहील. लिहुन घेणार हे पार्किंग वाटप करुन देतील, त्या प्रमाणे त्याचा वापर करावा लागेल.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 JALGAON-2

दस्त क्र. ९८० /२०१९
१५/४९

२६) **सदर** इमारतीतील पंप रूम, व लिफ्ट रूम, ही लिहुन घेणार यांचेकडे ताब्यात राहणार असुन त्यावर कोणासही कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार दाखविता येणार नाही किंवा राहणार नाही.

२७) **सदर** दस्तामध्ये काही एक त्रुटी, अडचणी, कमतरता, दुरुस्त्या, वगैरे राहिलेल्या असल्यास अगर कराव्या लागल्यास त्या **आम्ही लिहुन देणार** यापुढे केव्हाही करुन देईल. तसेच यापुढेही ज्याज्यावेळी आमच्या सह्या व प्रत्यक्ष हजेरी ची गरज पडेल त्यात्या वेळी आम्ही तुम्हास विनामुल्य हजर राहुन मदत करु. त्याबाबत काही एक अडीअडचण सांगणार नाही.

२८) **सदर दस्तातील** टाईप केलेला संपुर्ण मजकुर **आम्ही लिहुन देणार** व **तुम्ही लिहुन घेणार** यांनी वाचुन समजुन खात्री करून घेतलेला आहे. तो संपुर्ण मजकुर **आम्ही** दिलेले कागदपत्र व **आम्ही** दिलेल्या माहितीप्रमाणे बरोबर असल्याची **आमची** खात्री झालेनंतर **आम्ही** उभयतांनी खालील साक्षीदारांसमक्ष या दस्तावर **आमच्या** सह्या केलेल्या आहेत.

वेणेप्रमाणे भुविकास करारनामा व जनरल मुखत्यार पत्र आम्ही आमचे राजी खुशीने, स्वसंतोषाने, समजुन, उमजुन, कोणाचे दडपणास बळी न पडता, वाचुन घेवुन, उभय साक्षीदारां-समक्ष सह्या करुन आज रोजी जळगावी मुक्कामी लिहुन दिली असे. स.ता.म..





१) **शैलेश भानवत रडे,**

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 सह-दुय्यम निबंधक वर्ग-२ जळगांव-२ JALGAON-2

(१४)

जळगाव - २
दस्त क्र. ६८० /२०१७
१९१४६



२) सौ.समृध्दी शैलेश रडे, ----------

लिहुन देणार

पाटील ॲण्ड पवार असोसिएटस चे भागिदार



१) विजय दत्तात्रय पाटील, ----------



२) राहुल प्रभाकर पवार, ----------

लिहुन घेणार

* साक्षीदारांचे नाव,पत्ता व सही *

१) शर्मा गिरीधारी गुलाराम.
मेहरुण जळगाव

२) Chetan P. Pawar.
AS - Bhoise Nagar
Jalgaon.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांची मुद्रा सत्यमेव जयते जळगाव-२ JALGAON-2

दस्त क्र. ६८०७/२०१८
१८०/१८६

-:प्रतिज्ञापत्र:-

सदर दस्तऐवज हा भारतीय नोंदणी कायदा १९०८ व त्या अंतर्गत असलेल्या नियमातील तरतुदीनुसारच नोंदणीस दाखल केलेला आहे. दस्तातील संपुर्ण मजकुर,निष्पादक व्यक्ती,साक्षीदार,ओळखदार व दस्तासोबत जोडलेल्या कागदपत्रांची सत्यता दोन्ही पक्षकारांनी तपासली आहे.दस्ताची सत्यता/वैधता कायदेशीर बाबींसाठी दस्त निष्पादक पक्षकार व कबुलीधारक हे स्वत: जबाबदार राहतील. त्यास दुय्यम निबंधक व दस्तलेखक जबाबदार नाहीत.दस्तऐवजासोबत जोडलेली कागदपत्रे, कुलमुखत्यार धारक व्यक्ती,ओळखदार,साक्षीदार इत्यादी,बनावट आढळुन आल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी निष्पादकांची राहील.

महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ मधील नियम ४४ नुसार सदरच्या दस्तऐवजाची वैधता तपासण्याची जबाबदारी नोंदणी अधिकाऱ्यांची अथवा दस्तलेखकाची नाही. त्यांची पुर्णपणे खात्री लिहुन देणार व घेणार यांनी केलेली आहे. मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२ चे कलम ५५ नुसार दस्तातील नमुद मिळकतीचे Tital (हक्क) तपासावयाची जबाबदारी लिहुन देणार / घेणार पक्षकार यांची आहे. याची जाणीव दस्तातील दोन्ही पक्षकार यांना आहे व ते मान्य व कबुल आहे.

दस्तात नमुद केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही कार्यालयात अथवा न्यायालयात दावा/खटला/वाद दाखल नाही.तसेच दस्तात नमुद मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयातुन स्टेऑर्डर किंवा मनाई हुकुम मिळालेला नाही.याबाबतची समज दस्तातील लिहुन देणार /घेणार दोन्ही पक्षकार यांना आहे.सदर मजकुर आम्ही वाचला असुन तो आम्हांस मान्य व कबुल आहे.

लिहुन घेणार सही:-	लिहुन देणार सही:-
१) ----------	१) ----------
२) ----------	२) ----------
३) ----------	३) ----------

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 सह दुय्यम निबंधक वर्ग-२ जळगांव-२ सत्यमेव जयते JALGAON-2